International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# वाङमयीन प्रवाह एक समीक्षा — डॉ. सुनंदा रेवसे

**प्रा. प्रतिभा कृष्णराव आवंडकर (थोरात)**
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ४४४७०५

**प्रस्तावना :—** डॉ. सुनंदा रेवसे यांच्या समीक्षा साधनेचा प्रवास खडतर आहे. अनेक अडथळ्यावर मात करीत स्वत:ला सिद्ध करण्याचे परिश्रम लेखिकेने घेतले आहेत. यात क्षणोक्षणी जिवंत शब्दांचे स्पर्श जाणवतात. शब्दांचा चिवटपणा व मूळ तत्वाशी सुसंगत असा भावार्थ उलगडत जातो. जे सत्य आहे सामाजिक सुखाचे आहे निष्पाप व निरागस आहे ते सर्व कुशलतेने आणि सहजपणे हाताळणाऱ्या डॉ. सुनंदा रेवसे यांचा “ वाङमयीन प्रवाह : एक समीक्षा ” हा ग्रथ सर्वच अभ्यासकांना नितांत उपयोगी पडेल. डॉ. सुनंदा रेवसे यांचे लेखन शब्दांनी हुरळून जाणारे, अज्ञानीपण आणि कौतुकाच्या थापांनी डोक्यात अहंकाराच्या राशी उभारणारे खुजेपण या पलिकडे लेखिकेची निकोप, तटस्थ आणि पारदर्शी दृष्टी आहे.

डॉ. सुनंदा रेवसे यांनी समिक्षणात्मक क्षेत्रात महत्वाची कामगिरी केलेली आहे. त्यांची १ लोकमानस (समीक्षा ग्रंथ) २ आस्वाद आणि आकलन (समीक्षा ग्रंथ) ३ वाङमयीन प्रवाह : एक समीक्षा (समीक्षा ग्रंथ) ४ वेदना ते चेतना (चरित्र चित्र) डॉ. सुनंदा रेवसे यांचा लघुशोध प्रबंध प्रकाशित आहे. अंजनगाव सुर्जी परिसर परिसरातील ग्रामदैवतांचा अभ्यास' १ पुन्हा एकदा खोल गर्तेत (आत्मकथन) २ लोकदैवते आणि ग्रामदैवते (लोकसाहित्य) हे ग्रथ प्रकाशनाधिन आहे. तसेच त्यांचे आगामीग्रंथ १ भक्ती ते मुक्ती (संशोधन ग्रंथ) २ विश्वाचिये आर्त (समीक्षा ग्रंथ).

साहित्य समीक्षा हा साहित्याचे परखड परिक्षण करणारा वाङमयीन प्रवाह एकोणिसाव्या शतकात दिसून येतो. वाचकाला साहित्यातील बारकावे समजावते. साहित्याचे सर्वांगीन आकलन व्हावे यादृष्टीने समीक्षेला अनन्यसाधारण महत्व आहे. रचनेतील समीक्षेने उनकून निघतात, आणि वाचकाला रचनेच्या वेगवेगळ्या आस्वादांचा आनंद देतात असाच अनुभवसंपन्न प्रत्यय येतो तो डॉ. सुनंदा रवे से यांचा वाङमयीन प्रवाह वाचतांना विविध साहित्य प्रवाहांचा सुमधुर नाद त्यात आहे. आपले मत परखडपणे मांडण्याचे धाडस आणि सत्याची कास न सोडण्याचा सोशिक प्रयत्न या बाबींनी ह्या संघाचे उपयोजन निश्चितच आहे.

सामाजिक भूमिकेतून सतकार्याची महती सांगतांना ग. बा. सरदार म्हणतात, “ संत चळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ति नसुन धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्याच्या हक्कासाठी सनदशिरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती.” संताची, त्याच्या कार्याची आणि साहित्याची अशी समाजभिमुख प्रवृती केवळ अध्यात्मापुरती मर्यादीत नसून सामाजिक नैतिकतेला बळ देण्याचे भान त्यात गवसते, समाजाच्या अंतरगांतील चैतन्याला नवसंजिवनी प्राप्त करुन देण्याचे महान कार्य संतसाहित्याने केले आहे मानवतेचा उदडं घोष त्यात आहे, सामाजीक विचारांना खऱ्या अर्थाने नितिशुद्ध करण्याचे श्रेय

संतसाहित्याला जाते. संतांच्या कार्याचे, संतसाहित्याचे आकलन करुन त्याचां गौरव करण्याचे काम पहिल्या प्रकरणात लेखीकेने यथोचित शब्दांत केले आहे. संशोधक वृत्तीने संतसाहित्याचा विविधांगी अभ्यास आणि त्यातून सकस असा निष्कर्ष काढण्यात लेखीकेचा हातखडं आहे हे सुरवातीलाच सुज्ञ वाचकाला जाणविलाखेरीज राहत नाही. संतस्त्री आदर्श मुक्ताबाईला आध्यात्मिक अधिकारसंपन्न संबोधणाऱ्या डॉ. सुनंदा रेवसेनी मुक्ताईच्या अभंगानां विशिष्ट उंचीवर नेऊन ठवेले आहे. आपल्या भावंडांत धाकटी असुनही तीची थोरवी श्रेष्ठ ठरते. समाजाकडून अवहलेनेचे विष पचवूनही मुक्ताईच्या मुखी अमृताचेचं बोल आलेले दिसून येतात. ताटीच्या अभंगांतून मुक्ताईचा उपदेश ठायी ठायी प्रतीत होतो. आणि त्यादृष्टीने तीचा अधिकार लेखीकेने अधोरेखीत केला आहे.

मुक्ताबाईच्या लौकिक विलक्षण समाधीचे वर्णन नामदेव महारांज आपल्या अभंगात पुढील प्रमाणे करतात.

‘कडाडली विज निरांजनी जेव्हा। मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली। वैकुंठी लक्ष घंटा वाजती एक बाई। झाली मुक्ताबाई स्वरुपाकार। एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनी। जेव्हा निरंजनी गुप्त झाली। गेले निवारुनी आकाश आभुट नामा म्हणे.‘

वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसाराचे व्यापक दर्शन संत नामदवेवांच्या कार्यात दिसून येते. अंतकरणातील भक्तिचा ओलावा आणि जनसामान्यांच्या उध्दाराचा अपार जीव्हाळा यातून नामदवेवांची भावोत्कटता निदर्शनास येते. नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी या स्वप्नाचे पाठीराखे संत नामदवे आपल्या मधुर शब्दांतून अभंगाद्वारे जनसामान्यांचे या स्वप्नाचे प्रबोधन करत राहिले. संत ज्ञानेश्वरानंतर संत नामदवेवांनीच वारकरी संप्रदायाची धुरा आपल्या खांद्यावरुन वाहिली. अंतर्बाह्य प्रेम स्वरुप असणारा हा संत आपल्या अमृतवाणीने अजरामर असल्याचा लेखीकेने दिलेला निर्वाळा सार्थ वाटतो. संतसाहित्याचा चिकित्सक आणि चिंतनशिल अभ्यास हा लेखिकेच्या शब्दांना सामर्थ्य प्रदान करतो असा अभिप्राय दिल्यास तो योग्यचं ठरेल. सतराव्या शतकातील बहतुांश कालखंड संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या प्रखर वाणीने उजळून निघाला आहे. समाजाच्या उन्नयनाज सर्वाधिक सहभागी असणारा हा संत आहे. आचार आणि उच्चारात कमालीची एकवाण्यता त्यांच्या ठायी होती. लोकाभिमुखतेचा अनोखा आणि अपूर्व स्पर्श त्याच्ंया अभंगातून जाणवितो, सामाजिक व्यथांच्या प्रत्येक अंगाला स्पर्शनारी विपुल अभंग रचना तुकारामांनी केली. सामान्यांच्या वेदनानां हळुवारपणे कुरवाळणारा वात्सल्य भाव आणि अनितीवर कोरडे ओढणारा उग्र भाव यांचा सुरेख संगम म्हणजे तुकारामांची अभंगरचना होय, मराठी साहित्याचे दालन समृद्ध करण्याचे मोठे श्रेय त्यानां दिले जाते. तुकारामांच्या प्रबोधनाला आपल्या आचरणांत उतरविण्याची ताकद आपल्या वर्तनात येवो अशी रास्त अपेक्षा लेखिका करते त्यावेळी तुकारामांच्या अभंगातील कालातिता पटल्यावाचून राहत नाही.

साहित्य हा इतिहासाचे मूर्त रुप होय ऐतिहासिक घटनांना विस्तृत धांडोळा जसा इतिहासचार्यांनी घेतला, तसाच किंबहुना जाणिवांचे गर्भार्थ जोडून साहित्यीकांनी त्या घटनांना जीवंतरुप दिले आहे. वाङमय आणि इतिहास यांच्या एकजीव मिश्रणातून अनेक कथा

कादबऱ्यांचा जन्म झाला आहे. सर्वसमावेशक अश्या साहित्य क्षेत्रांचा ऐतिहासिक संबंध विशद करतांना लेखिकेने पणाला लावलेले लेखन कसब निश्चितच वाखानण्याजागे आहे, आणि वाचकांना त्याचा अनुभव येईल याची खात्रीही आहे. ग्रामव्यवस्थेचे यथार्थ चित्रण उभे करणाऱ्या पक्षीकूळात गीताचा आस्वाद घेण्याचे व मानवी समूहाशी समरस असणारी ही लोकरचना लेखिकेला लोकप्रतिभेचा अविष्कार वाटली, त्यातून गीताचा लोक मानसांत असणारा प्रभाव उत्कटपणे मांडला आहे. भुलाबाईची वा भोदंल्याची गाणी हा प्राचिन परंपरचा अविभाज्य भाग म्हणून आजही प्रचलित आहे जीवनाच्या विविध वळणांवर होणाऱ्या संस्कारांचे वर्णन या गीतांतून केले आहे. लेखिकेने या गाण्यांमधील गुढरम्यता वाचकांसमोर उलगडून ठेवली आहे यातील कित्येक शब्दांचा अर्थ, जो सामान्य वाचकांच्या आकलनापल्याड होता, त्याचे चिकित्सक अर्थ या प्रकरणात कळतात. लोक मानसांत रुजलेली ही परपंरा लोक संस्कृतीशी किती एकरुप आहे याचा प्रत्यय येतो.

लोकजीवनाचा तळ ढवळून काढण्याची जिज्ञासा ज्याला आहे. लोक संस्कृतीचा आपण एक घटक आहो, अशी धारणा ज्याची आहे, त्यास लोकपरंपरांचा आणि लोक कलाचां लोभ असेल यात शंका नाही. आदिम संस्कृती ही केद्रं आजच्या आधुनिक काळात निरस किंवा टाकावू वाटत असतील परतूं त्यात संस्कृतीचे खरेखुरे प्रतिबिंब दिसून येते, लोककलांची अखडंता जोपासण्याची लेखिकेची तळमळ, सास्कृंतिक वारसा टिकवण्याची धडपड होय.

‘तमाशा’ ह्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेविषयी विस्तृत आणि सम्पर्क माहिती लेखिकेने चितारली आहे. तमाशा या प्रकाराकडे पाहण्याचा वाचकाचा दृष्टीकोन निर्दोष करण्याचे कसब लेखिकेने साधले आहे. तमाशा विषयी असणारे गैरसमज दूर व्हावेत आणि या लोककलांची संवर्धन व्हावे असा संदेश देण्यात लेखिका यशस्वी झाली आहे. लोक संपदेला जपावे, नि तिचे संवर्धन व्हावे असा सुप्त इशारा ही त्यात आहे. कादंबरी हा साहित्य प्रवाह सामान्य वाचकाला नेहमीच आपुलकीचा वाटत आला. समाजजीवनाचा आरसा म्हणुन कादंबरीकडे बघीतले जाते. आपल्या भावविश्वाची गुपिते त्यात शोधण्याचा वाचकाचा प्रयत्न असतो. राजकीय कादंबरी हा एक कादंबरी प्रकार विस्तृतपणे मांडतांना लेखिकेने स्वातंत्रोत्तर काळातील गढूळ राजकारण असणाऱ्या, सामाजीक शोषनाशी केद्रं बनलेल्या, समाजकारणाशी फारकत घेतलेल्या तलाहिन सत्तास्पर्धेचे चित्र उभे केलेल्या काही कादंबऱ्यांचा धांडे का घेतला आहे त्यातून समाजजीवनाशी असणारा लेखिकेचा जीव्हाळा दिसून येतो. या राजकीय कादंबऱ्यांतून अधोरेखीत होणारी समाज विघातक कृत्ये, अनैतिक तडजोडी लेखिकेला व्यथीत करतात आणि त्यातून लेखिकेच्या शब्दांना धुमारे फुटतात.

गडकऱ्यांच्या नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा आणि धग कादंबरीची, नायिका, कौतिकचा संघर्ष मांडतांना, स्त्री विश्वातील भल्याबुऱ्या रुपांचा जीवनपट उलगडत जातो, स्त्रीयांच्या व्यथा वेदनांशी अंतस्थ जाणिव लेखिकेला आहे. गडकऱ्यांसारख्या प्रतिभा संपन्न जाणिवांची उत्कटता उभी करण्यात लेखिकेने आपले शब्दसामर्थ्य पणाला लावले आहे. स्त्री

गुणवैशिष्ट्यांचे विविध पदर उलगडून दाखविले आहेत आणि त्यातून समाज प्रबोधनाचा प्रयत्नही केला आहे.

आधुनिक काळात कथेतील कल्पनाविस्तार संपूर्ण कथेला वास्तवाचे भान आलेले दिसून येते. केवळ रजंनासाठी शब्द खर्ची पडू नयेत तर त्यातून वैचारिक परिवर्तनाचा हेतू साधला जावा असा विचार चारुता सागर यांच्या कथेतून जाणवतो. लेखिकेने सागर यांच्या काही कथांमधून मानवी मनाचा वेध घेण्याचा सफल प्रयत्न केला आहे. जगण्याची प्रचंड ईच्छा ही कुठल्याही उदंड वेदनेपेक्षा मोठी असते, त्यातुन घडणारा संघर्ष अपरिहार्य असतो. शेवट किती विदारक किंवा उपकारक असेल यापेक्षा मानवी मुल्याची पाठराखण कशी होईल? या चिंतेतुन समोर आलेले लेखीकेचे चिंतन वाचकाला आपल्या आत ऐकावायला पुरेस आहे. परवड होत असतांना, वास्तवाशी दोन हात करतानां, धैर्य प्राप्त व्हावे ही जाणीव निर्माण करण्यात लेखिका यशस्वी झाली आहे.

अण्णाभाऊ साठे यांनी सामाजिक विषमतेला छेद देणारे वास्तववादी साहित्य निर्माण केले. त्यांच्या विविधांगी साहित्याचा अभ्यास, त्यावर चिंतन आणि त्यातील गर्भीत आशय सहज शोधून काढणारी लेखिकेची परिक्षक दृष्टी हे प्रकरण वाचकांना सातत्याने जाणवते. भुक ही माणसाची नैसर्गिक भावना आहे. बहुजनांच्या तोडांतील घास नाकारणाऱ्या तथाकथीत समाज व्यवस्थे विरुद्ध प्रखर विद्रोही विचार मांडणारा, अनुभवसिद्ध लेखक म्हणुन साहित्य विश्वात साठेंची ओळख आहे. त्यांच्या लिखानातील मर्म समर्थपणे, समजून उमजून लेखीकेने साठेंच्या जाणिव मुल्यांना नव संजीवनी दिल्याचा प्रत्येय वाचकाला येतो.

आदिवासी साहित्य आणि नक्षलवादी चळवळ या प्रकरणात नक्षलांच्या मूळाशी जावून त्यांची बंड आदिवासी अस्मितेच्या जागृतिकरीता कसे साहाय्यक ठरले? याचा लेखाजोखा लेखिकेने मांडला आहे. आदिवासी साहित्य हा वाङमय प्रवाह, वेळोवळीं आदिवासींच्या हक्काची जाणिव शासणाने न ठेवल्यामुळे अस्तित्वात आला. आदिवासींचा कैवार घेण्याचे काम नक्षली चळवळीने केल्यामुळे साहाजिकच आदिवासी या चळवळीत ओढला गेला. आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांचे दमन करण्याचा मार्ग त्याला सापडला या प्रवाहाच्या एका बाजूला आदिवासी समृद्ध संस्कृतीचे नैसर्गिक गोडवा असणारे चित्र आहे तर दुसऱ्या बाजुला उपेक्षा, शोषण, अन्याय, कुट यांचा गडद अंधार आहे. हा अंधार दूर करण्यासाठी नक्षल चळवळीचा सहारा घेणारा आदिवासी तरुण, माणुस म्हणून समजून घेणारी लेखिकेची शोधक वृत्ती भावणारी आहे.

आदिवासी समाजातील वैवाहिक पद्धतीचा उहापोह लेखिकेने नेमकेपणाने मांडला आहे. अज्ञान आणि शिक्षणाचा अभाव यामुळे अंधश्रद्धेचा आदिवासी जगण्यावर असणारा प्रभाव लेखिकेने अभ्यासुपणे लिहीला आहे. हे प्रकरण वाचतांना येवढ्या प्रगत जमान्यात आदिवासी जाती जमाती अजुनही अंधारात धडपडत जगत असल्याची जाणिव मनाला पिळ देणारी आहे. वाचकांना स्त्रि स्वातंत्र्याचा नवआदर्श समजावून सांगण्याचे लेखिकेचे प्रयत्न स्तुत्य आहते.

सिलीपसेरा ह्या डॉ. मधकुर वाकोडेच्या कादंबरीचा विस्तृत आढावा घेतांना त्यातील देशीयतेच्या परिमाणांना अधोरेखित करण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे. सामाजिक विकासाचा एकून साध्य करणारी कलाकृती ही देशी परिमानांचे भान राखनुच अधिक सकस पणे शब्दबद्ध होऊ शकते यावर लेखीकेचा प्रगाढ विश्वास आहे सामाजिक बांधिलकी जोपासतांना ती समताधिष्ठीत असावी त्यात वंचीतांबद्दल कणव असावी आणि शोषकांबद्दल चिड असावी असे सुत्र पाळून डॉ. मधुकर वाकोडे यांनी जिवनमुल्यांचा पुरस्कार केला, त्याचे आरस्पाणी रुप डॉ. सुनंदा रेवसेंच्या लेखनीतुन उतरले. देशी परिमानांना बोलीतुन आणि विषयातुन उजागर करणारी लेखिकेची दृष्टी निकोप आणि सकस आहे. असे आवर्जून वाटते.

आदिवासी जीवनातील मर्माचा नेमका शोध घेतांना लेखिका आदिवासी जाणिवांचा आशय सहज हाताळते त्या समाजातील मूल्यजाणिवांचा हुंकार लेखिकेच्या नजरेतून सुटला नाही आपले हक्क आपण मिळवावेत, अन्यायाला वाचा फुटावी, विकास व्हावा अशी आशा आदिवासी कवितेला आहे. आदिवासींच्या जगण्यातील ह्रदयद्रावक अनुभूती लेखिकेला अस्वस्थ करते. त्यातून जे शब्द आकाराला येतात, ते दांभिक नसतात. दीर्घ चिंतनशिलतेच्या मजबूत बैठकीवर ते विराजमान असतात. आदिवासींच्या व्यथा, वेदनांवर प्रखर भाष्य करतात. लेखिकेची ही सहजवृत्ती त्यांच्या लेखनीला बळ देते आणि या वाडमय प्रवाहाचे पदर उलगडत जातात.

'वस्ती वाढत आहे' हा हिवराळेचां कवितासंग्रह, दलित, शोषित, वंचित समाजाला दिल्या जाणाऱ्या सापत्न वागणूकीविरोधात बंड करणारा. शब्दांनी जागृतीची मशाल पेटविणारा त्यावर मार्मिक भाष्य करतानां लेखिकेने सोदाहरण हिवराळेंच्या कवितांचा आशयगर्भ उकलत नेला. कवितेचा संदेश देतांना माणसाचे माणूसपण स्विकारण्याची आर्तता प्रकटली. विषमतेच्या शृंखला तोडून ज्या ताकदीने कविता विद्रोह करते त्याच सामर्थ्याने लेखिकेने कवितेचा सार मांडला आहे आणि रास्त अपेक्षांचा भार वाचकाच्या मनावर टाकला आहे.

स्त्री बदलाच्या दिशेने पडणाऱ्या प्रत्येक पावलाचा लेखिकेला ध्यास आहे. स्त्री दास्याचा काळोख मिटला असा केवळ भास होतो परतुं वास्तवात स्त्री मुक्ती या दालनाचा कडीकोडां अद्यापही पूर्णपणे निखळला नाही ही सामाजिक आणि कौटुंबीक शोकांतिका आहे. शिक्षणामुळे जगण्यासाठीच्या विविध क्षेत्रांत आजची स्त्री अग्रक्रमाने संचार करीत आहे. तीला स्वत्वाची जाणिव आहे. साऱ्या उणिवांशी झुंजतांना ही रणरागिणी समाजाचा कायापालट करीत आहे. पुरूषप्रधान असलेल्या समाजाला वाचा फोडण्याचे बळ अंगी बाळगणारी स्त्री स्वत:चे ममत्त्व, वात्सल्यभाव कदापी विसरणार नाही असा प्रचडं विश्वास लेखिकेला आहे. तो सार्थ ठरविण्याची जबाबदारी प्रत्येक स्त्रीची आहे. आणि त्यास मन:पूर्वक दुजोरा देण्याचे कर्तव्य प्रत्येक पुरूषाचे आहे. असे झाल्यास संसाराचा आणि पर्यायाने समाजाचा स्वर्ग झाल्याखेरीज राहणार नाही.

समाजिक दृष्ट्या मागास समजल्या जाणाऱ्या आदिवासी स्त्रीयांच्या न्याय हक्कानां वाचा फोडण्याचे काम लेखिकेने केले आहे. स्त्रीचा मानव म्हणून अधिकार तीला प्राप्त व्हावा अशी रास्त अपेक्षा लेखिका करते लोकमानस व आस्वाद आणि आकलन हया दोन ग्रंथावरील समिक्षात्मक लेखांचा समावेश अखेरीस करून समिक्षा प्रवाहातील नवलेखकाला उभारी देण्याचे काम लेखिकेने केले आहे. 'पडणाऱ्याला हात देणे' आणि 'धडपडणाऱ्याला बळ देणे' हा समतेचा मूलमंत्र जपणाऱ्या डॉ. सुनंदा रेवसे यांनी विविध वांङ्मयीन प्रवाहांना सशक्तपणे हाताळले आहे. या ग्रथातून त्याच्या अभ्यासूवृत्ती, प्रखर आकलनक्षमता, समर्पक चिंतनशिलता अश्या अनेक अनोख्या पैलूंचे दर्शन घडते. अतिव कष्टानी पोसलेल्या देहाने प्रत्यक्ष अनुभूतीद्वारे सारे काही सोसले. त्यातून कमालीची सहनशिलता प्राप्त झाली, सूक्ष्म. आकलनाचे दान पदरात पडले. ज्ञानाच्या बळावर अज्ञानाचा अंधार दुर सारू पाहणाऱ्या, विशिष्ठ उंचीची संशोधक दृष्टी प्राप्त असणाऱ्या, डोळसपणे कलाकृतिचा वेध घेणाऱ्या डॉ. सुनंदा रेवसे यांचा 'वाङ्मयीन प्रवाह एक समिक्षा हा ग्रंथ भाषा समृध्दीचे अमूल्य कार्य करले अशी आशा बाळगायला अजिबात हरकत नाही.

**संदर्भ ग्रंथ सुची –**

१ लोकमानस (समीक्षा ग्रंथ) डॉ. सुनंदा रेवसे

२ आस्वाद आणि आकलन (समीक्षा ग्रंथ) डॉ. सुनंदा रेवसे

३ वाङमयीन प्रवाह एक समीक्षा (समीक्षा ग्रंथ) डॉ. सुनंदा रेवसे

४ लोकसाहित्य दर्शन संपा. डॉ. रमेश कृ. देवरे

५ संस्कृतीच्या पाऊलखुणा द. ता. भोसले.

६ संत वाङमयाची सामाजिक फलश्रृती ग. बा. सरदार

७ तुकाराम व्यक्तिगत व कवित्व डॉ. किशोर संजय डॉ. मनोज तायडे

८ अनुवादक चोरघडे ते वामन ग्रंथ नाम व प्रकाशन पूर्व आणि पश्चिमेच्या संत महिला शारदादेवी जन्म शताब्दी स्मृती ग्रंथ पृ.६०

९ डॉ. लळीत बाळकृष्ण ग्रंथ नाम व प्रकाशन श्री मुक्ताबाई चरित्र अमोल प्रकाशन, पुणे

१० पाच संत कवी शं. गो. तुळपुळे

११ प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास ह. भी. शेणालीकर

१२ संपा. डॉ. मुनघाटे प्रमोद आदिवासी मराठी साहित्य स्वरुप आणि समस्या – प्रतिमा प्रकाशन पुणे

१३ सोनवणे वाहरु–गोधड–रविराज प्रकाशन पुणे फेब्रु १९८७ पृ ४०

१४ संपा. रातगडकर राजाभाऊ आदिवासी मान त्रैमासिक